# महाराष्ट्र शासन

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

जा.क्र.एसआयएसी/२०२५-२६/सामायिक प्रवेश परिक्षा/ दिनांक- १४/०८/२०२५

## निकालाच्या यादीबाबत तसेच Undergraduate विद्यार्थ्यांना सूचना

सन २०२५-२६ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा पार पडली असून अंतीम निकाल दिनांक १४.०८.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालानूसार प्रवेशासाठी एकूण १६४२ विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत.

संकेतस्थळावर खालील निकालाची (पात्र व अपात्र) विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादीही सुलभ माहीतीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे, त्याचे अवलोकन करावे.

1. List of Qualified candidate (No of Students)-3232
2. List Candidate Eligible for Interview (No of Students)-1642
3. List of Candidate Not Qualified (No of Students)-1202
   (GS less than 1 mark or CSAT less than 33 marks or both subjet less marks) -
4. List of Undergraduate candidates (No of Students)-170

- १७० विदयार्थी हे पदवी पुर्ण नसल्यामुळे मुलाखतीस पात्र नाहीत (Undergraduate candidates) तथापी यापैकी ज्यांनी **आपला अर्ज undergraduate असे कळत/ नकळत नमुद केल्यामुळे त्यांचे नांवे मुलाखतीच्या यादीत आलेली नाहीत/ ज्या विदयार्थ्याचा निकाल हा किमान पातळीपेक्षा अधिक व पदवी पुर्ण असेल, अशा विदयार्थ्यांनी onlinesiac@gmail.com या ईमेलवर सोबत जोडलेले हमीपत्र भरून दि.२१.०८.२०२५ पर्यंत सादर करावे. तसेच पदवी प्रमाणपत्र, आपला निकाल व भरलेला फॉर्म भरुन मुलाखतीची संधी देण्याबाबत विनंती ई मेल करावा. याबाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. यांची नोंद घ्यावी**.

तसेच पुढील मुलाखतीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचा **मुलाखत कार्यक्रम दिनांक २१.०८.२०२५ पासून** ०६ केंद्रावर **ऑनलाइन पद्धतीने** आयोजित करण्याचे प्रस्तावीत आहे. मुलाखतीबाबत सविस्तर सूचना आपणांस www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील, तसेच प्रस्तावीत मुलाखत कार्यक्रम आपणांस **ई मेल तसेच लघुसंदेशाव्दारे कळविण्यात येईल** विद्यार्थ्यांनी मुलाखती संदर्भातील पूर्व तयारी करावी, पुढील सूचनांसाठी या कार्यालयाचे अधिकृत **संकेतस्थळाचे अवलोकन करावे.**

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**

दिनांक

# हमीपत्र

## किमान गुण प्राप्त केलेले परंतू परीक्षा नोंदणी वेळेस पदवी उत्तीर्ण नसलेले विद्यार्थी/अनावधनाने UnderGraduate नमुद केलेले (१७० विद्यार्थ्यांच्या यादीतील समावेश असलेले) विद्यार्थ्यांनी मुलाखत संधी मिळणेकरिता भरुन द्यावयाचे हमीपत्र

मी, श्री.-------------------------------------------------------------------आपल्या राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व्दारे आयोजित नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२६ साठी ऑनलाईन अर्ज application no------------------- seat no----------------- भरलेला आहे. तथापि सदर अर्ज भरताना माझ्याकडून शैक्षणिक अर्हता Undergraduate असे अनावधानाने नमूद करण्यात आलेले होते/मी पदवीपुर्व अर्ज भरला होता. त्यामुळे माझ नांव मुलाखतीस पात्र विदयार्थ्याच्या यादीत समावेश झालेले नाही. माझे नांव आपल्याकडील undergraduate candidate list मध्ये समावेश करण्यात आलेले आहे. त्यामुळे मी मुलाखतीच्या संधीपासुन वंचित राहू शकतो. मी परीक्षेपूर्वीच पदवीधर Graduate असून/परीक्षेनतर पदवी उतीर्णही आहे. तसेच माझा निकाल मुलाखतीसाठी किमान गुणांच्या मर्यादेतही आहे. आपण माझ्या प्रोफाईलमध्ये शैक्षणिक अर्हता दुरुस्ती करुन माझ्या नावाचा समावेश मुलाखतीस पात्र विदयार्थ्यांच्या यादीत करुन मला मुलाखत देण्यासाठीची संधी, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई, निवड समिती यांचेकडील निर्णयास अधिन राहून उपलब्ध करुन दयावी ही विनंती.

आपला विश्वासू,

सही-

नांव-

मोबाईल नं-

सोबत-

१) ऑनलाईन अर्ज
२) निकाल
३) पदवी प्रमाणपत्र
४) हमीपत्र

टीप- सदरील माहिती दि.२१.०८.२०२५ पर्यंत onlinesiac@gmail.com या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावे.यापूर्वी ईमेल केला असला तरीही या नमून्यात पूरक कागदपत्रासह ईमेल पाठविण्यात यावा.